# योजनांची सविस्तर माहिती

## अ) केंद्र पुरस्कृत आयसोपॉम योजनेअंतर्गत कडधान्य/गळीतधान्य विकास कार्यक्रम

सदर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुसुचित जाती /जमाती व सर्वसाधारण शेतकऱ्यांना खालीलप्रमाणे विविध बाबींचा लाभ देण्यात येतो.

**१. जिवाणू संवर्धक पाकिटे -**

गळीतधान्य/कडधान्य पिकांचे वाढीसाठी लागणारे नत्र व स्पुरद पिकांना नैसर्गिक रित्या उपलब्ध करुन देण्यासाठी ऑझोटोबॅक्टर, रायझोबियम, पीसबी इ. जिवाणू संवर्धक खते किंमतीच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त १०० रु. प्रति हेक्टर अनुदानावर शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येते. सदर खते पेरणीपुर्वी किंवा जमिन तयार करण्याचे वेळी वापरण्या ाच्या उद्देशाने पंचायत समिती स्तरावरन शेतक-यांना उपलब्ध करत्र्न देण्यात येतात .

**२. जिप्सम वाटप-**

जमिन सुधारणेसाठी शेतक-यांना किंमतीच्या ५०टक्के अधिक वाहतुक खर्च १०० टक्के किंवा ७५० - प्रति हेक्टरी यापैकी जे कमी असेल तेवढया अनुदानावर शेतकऱ्यांना जिप्सम उपलब्ध करत्र्न देण्यात येते.

**३. सुधारीत कृषि औजारे पुरवठा-**

शेतीकामासाठी लागणारे विविध प्रकारची औजारे ५० टक्के अनुदानावर पुरविण्यात येतात . बैलाच्या,मनुष्यबळाच्या साहाय्याने चालणाऱ्या औजारावर रत्र .२५००- किंवा किंमतीच्या ५० टक्के यापैकी जे कमी असेल ते व स्वंयचलित औजारावर रत्र१५००० अथवा किंमतीच्या ५० टक्के यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येते.

**४. एच. डी. पी. ई. पाईप-**

पिकांना पाणी देण्यासाठी ५० टक्के अनुदानावर .एच. डी. पी. ई. पाईप चा पुरवठा केला जातो. या योजनेअंतर्गत प्रती लाभार्थी ८०० मीटर पाईप देण्यात येत असुन शेतकऱ्यांना रत्र१५०००- पर्यंत अनुदान देय आहे.

**५. पिक संरक्षण उपकरणे पुरवठा-**

शेतकऱ्यांना लागणारे विविध प्रकारचे फवारणी पंप, डस्टर, पॉवर स्पेअर इ. चा ५० टक्के अनुदानावर पुरवठा केला जातो. यापैकी हस्तचलित उपकरणांवर जास्तीत जास्त रत्र८००/- प्रति औजार व स्वंयचलित उपकरणांवर जास्तीत जास्त रत्र २०००/- प्रति औजार यापैकी जे कमी असेल ते अनुदान देय आहे.

**६. पिक संरक्षण औषधी वाटप-**

गळीत व कडधान्य पिकावरील किड/रोगनियंत्रणासाठी शेतकऱ्यांना ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ५००/- प्रति हेक्टर अनुदानावर पिक संरक्षण औषधे उपलब्ध करुन देण्यात येतात.

**ब) केंद्र पुरस्कृत ऊस विकास योजना-**

ऊस पिकाचा उत्पादन खर्च कमी करुन उत्पादकता वाढविण्यासाठी ऊस विकास योजना राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत कृषि विकास अधिकारी स्तरावर सुधारित कृषि औजारांचा पुरवठा करण्यात येतो. यासाठी स्वंचलीत व ट्रक्टर चलीत सुधारित कृषि औजारे किंमतीच्या २५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु. १५०००/- या पैकी जे कमी असेल त्या दराने अनुदान देय आहे.

**क) राज्य पुरस्कृत पिक संरक्षण योजना(फलोत्पादन) -**

सदर योजनेअंतर्गत मिर्ची पिकावरील किड/रोग नियंत्रणासाठी ५० टक्के अनुदानावर औषधांचे वाटप करण्यात येतो.

उपरोक्त योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी जमीनीचा ७/१२, ८ अ, नकाशा, ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र व मागणी अर्ज पंचायत समितीचे कृषि विभागास सादर करावयाचे असते.